

**१ मे २०१५ नंतर होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये मतदान यंत्रावर प्रदर्शित केल्या जाणाऱ्या मतपत्रिकेमध्ये उमेदवारांचे फोटो मुद्रित होणार. निवडणूक आयोगाचा हा निर्णय लोकतांत्रिक व संवैधानिक आहे. लोकशाहीच्या दृष्टीने पडलेले महत्वाचे पाऊल आहे.**

- जुलमी इंग्रजांचा अन्याय, अत्याचार सहन करण्याची क्षमता संपल्यामुळे देशातील जनतेने १८५७ मध्ये स्वातंत्र्याची लढाई सुरु केली.
- १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षामध्ये शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांसारख्या लाखो शहीदांनी आपले बलिदान दिले.
- १९४७ मध्ये भारत देश स्वतंत्र झाला. इंग्रज या देशातून गेला.
- ज्या लाखो शहीदांनी आपले बलिदान केले होते त्यांचे स्वप्न होते की, इंग्रजांना या देशातून हाकलून देशात लोकशाही आणायची. जी लोकांनी, लोकांची, लोक सहभागातून चालविलेली शाही ती लोकशाही.
- १९४७ मध्ये इंग्रज या देशातून गेला. मात्र देशात जी लोकशाही यायला हवी होती ती लोकशाही आली नाही. कारण पक्ष आणि पार्टी तंत्राने लोकशाहीला देशात येऊच दिले नाही.
- १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले. १९४९ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाचे सुंदर संविधान बनविले. त्या संविधानात कुठेच पक्ष-पार्टी, चिन्ह, समूहाचे नाव नाही.
- आपल्या संविधानामध्ये अनुच्छेद ८४ मध्ये (क) व (ख) मध्ये असे म्हटले आहे की, भारतात राहणारी कोणतीही व्यक्ती जिचे वय २५ वर्ष आहे अशी व्यक्ती लोकसभेची निवडणूक लढवू शकते.
- भारतात राहणारी कोणतीही व्यक्ती जिचे वय ३० वर्ष झाले आहे ती व्यक्ती राज्यसभेची निवडणूक लढवू शकते. संविधान पक्ष आणि पार्टीच्या समूहाला निवडणूक लढविण्याची परवानगी देत नाही.
- २६ जानेवारी १९५० मध्ये आमच्या देशात प्रजासत्ताक दिवस साजरा केला गेला. जनता या देशाची मालक झाली. त्यावेळेसच पक्ष आणि पार्ट्या बरखास्त व्हायला हव्या होत्या. कारण संविधानात पक्ष आणि पार्ट्यांचे नाव कुठेच नाही. म्हणूनच महात्मा गांधीजींनी काँग्रेसवाल्यांना म्हटले होते की, जनता या देशाची मालक झाल्यामुळे काँग्रेस पार्टी बरखास्त करा. आता पार्टीचे काही काम नाही.
- १९५२ मध्ये देशात पहिली निवडणूक होणार होती. त्या वेळी पक्ष-पार्टी बरखास्त तर झाली नाहीच उलट काँग्रेस आणि इतर पार्ट्यांनी संविधानामध्ये पक्ष आणि पार्टीला निवडणूक लढविण्याची परवानगी नसतानाही निवडणूक घटनाबाह्य पद्धतीने लढविण्याचा निर्णय घेतला. त्यावेळेस तत्कालीन निवडणूक आयोगाने मनाई करायला हवी होती. मात्र आयोगाने मनाई केली नाही. त्यामुळे १९५२ च्या निवडणूका घटनाबाह्य पद्धतीने झाल्या.
- घटनाबाह्य निवडणुकांमुळे पक्ष आणि पार्टीमध्ये सत्ता स्पर्धा सुरु झाली. प्रत्येक पार्टी येन-केन प्रकारे निवडणूकीत निवडून यायचे व सत्ता काबीज

करायची एवढाच विचार करायला लागली.

- निवडणुकांमध्ये सत्ता स्पर्धेमुळे राजकीय पक्षांनी उमेदवार गुंड आहे, भ्रष्टाचारी आहे, लुटारु आहे, व्यभिचारी आहे हे माहीत असूनही कलंकित उमेदवारांना आपल्या पक्ष-पार्टीचे तिकीट द्यायला सुरुवात केली. कारण त्यांच्या मागे मतांचा गठ्ठा आहे.

- यामुळे लोकसभेसारख्या लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये भ्रष्टाचारी, गुंड, लुटारु उमेदवार निवडून जाऊ लागले. आज लोकशाहीच्या पवित्र मंदिरात सुमारे १७० कलंकित लोक बसलेले आहेत.

- पक्ष आणि पार्टीने घटनाबाह्य निवडणुका लढविल्यामुळे संसदेत पार्टींचा समूह बनला आणि समाजामध्येही पक्ष-पार्टींचे समूह तयार झाले.

- पक्ष आणि पार्टीच्या समूहांमूळे देशात भ्रष्टाचार वाढतच गेला. समूहामूळे गुंडागर्दी, लूट वाढली. समूहामुळे दहशत वाढली. संविधानानुसार लोकांनी निवडलेला चारित्र्यशील वैयक्तिक उमेदवार संसदेमध्ये निवडून गेला असता तर भ्रष्टाचार, गुंडागर्दी, लूट, दहशत वाढली नसती.

- आपल्या देशात २जी स्पेक्ट्रम घोटाळा, हेलिकॉप्टर घोटाळा, कोळसा घोटाळा, व्यापमं घोटाळा यांसारखे करोडो रुपयांचे घोटाळे झाले आहेत. हे पक्ष आणि पार्टीच्या समूहांमुळेच झालेले आहेत.

- महात्मा गांधीजी म्हणत होते की, देश जर बदलायचा असेल तर आधी गाव बदलणे आवश्यक आहे. जो पर्यंत गाव बदलणार नाही तोपर्यंत देश बदलणार नाही. आज आपल्या देशात अधिकांश गावात पक्ष आणि पार्टीच्या समूहाने आपापले गट तयार करुन गावकऱ्यांच्या मध्ये आप-आपसात भांडण-तंटे लावले आहेत. यामुळे बहुतेक गावांचा विकास थांबलेला आहे. पर्यायाने देशाचा विकास थांबला आहे.

- आपल्या देशातील लोकसभा ही लोकांची सभा व्हायला हवी होती. घटनेप्रमाणे वैयक्तिक चारित्र्यशिल व्यक्ती निवडून गेला असता तर ती लोकांची सभा बनली असती. परंतू आज घटनाबाह्य पक्ष आणि पार्टीचे लोक संसदेमध्ये गेल्यामुळे ती लोकांची सभा न राहता पक्ष आणि पार्ट्यांची सभा बनली आहे.

- युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती आहे. या युवाशक्तीला जागे करुन विधायक कामासाठी लावले असते तर समाज व देशाचे उज्वल भवितव्य दूर नव्हते. परंतू पक्ष-पार्टींच्या समूहाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आपापल्या पक्ष आणि पार्टीचे निवडणुकांसाठी गट तयार करुन जी युवाशक्ती राष्ट्राच्या विकासासाठी लावायला हवी होती त्यांमध्ये निवडणूकीसाठी भांडण-तंटे लावून दिले.

- आज उच्च शिक्षणामध्ये मेडिकल, इंजिनीअरींग, लॉ सारखे अनेक कॉलेज काढण्यात आले. पक्ष आणि पार्टीने यातील बहुतेक कॉलेजमध्ये विभाजन करुन आपली दुकाने उभारली. यामुळे सामान्य परिवारातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत.

- स्वातंत्र्याच्या ६८ वर्षांनंतरही आम्हाला लोकशाहीमध्ये खरे यश मिळाले नाही. याचे कारण म्हणजे समाज आणि देशाची काळजी करण्याऐवजी पक्ष आणि पार्टीचे समूह आपापल्या पक्ष आणि पार्टीची जास्त काळजी करु लागले.

- पक्ष आणि पार्टीच्या या समूहाने एकत्र येऊन असा निर्णय घेतला आहे की, पक्ष आणि पार्टीच्या

निवडणुकांसाठी जो पैसा लागतो त्यामध्ये २० हजार रुपयांचे डोनेशन देणाऱ्यांचा हिशेब जनतेला द्यायचा नाही. यामुळे अनेक पक्ष आणि पार्ट्या मोठ-मोठ्या उद्योगपतींकडून लाखो-करोडो रुपयांच्या देणग्या घेतात व त्याचे २०-२० हजार रुपयाचे तुकडे करून बोगस नावे देऊन आपल्या देशातील काळा पैसा पक्ष आणि पार्टीच्या माध्यमातून पांढरा केला जातो. हा या देशासाठी मोठा धोका आहे.

- घटनाबाह्य निवडणुका लढवून पक्ष आणि पार्टीचे उमेदवार संसदेमध्ये जनतेचे सेवक म्हणून गेले. आज त्यांना राहण्यासाठी बंगला, गाडी, टेलिफोन, लाईट, पाणी, विमान प्रवास, प्रथम श्रेणीचा रेल्वे प्रवास, ए.सी. सारख्या सुविधा घेत आहेत. याशिवाय प्रत्येक महिन्याला पन्नास हजार रुपये पगार घेत आहेत. तरीही आज संसदेत बसलेले पक्ष आणि पार्टीचे अधिकांश उमेदवार एकत्र येऊन पन्नास हजार रुपये पगार कमी पडत असल्याचे सांगून एक लाख रुपये पगार मिळावा अशी मागणी करत आहेत. खासदार हे लोकप्रतिनिधी असल्याने व जनता ही मालक असल्याने त्यांना आपला पगार वाढून हवा असल्यास या विषयी जनतेचे मत विचारात घ्यायला हवे होते. परंतू असे न होता जनतेच्या पैशाचा आपल्या मर्जीप्रमाणे वापर करून घेतात हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही.

- ज्या परिस्थितीतून आपला देश जात आहे अशा परिस्थितीत देशाला उज्वल भवितव्य मिळण्याची शक्यता वाटत नाही. जर आपल्या देशाला उज्वल भवितव्य द्यायचे असेल तर त्याची चावी मतदार जनतेच्या हातात आहे.

- यापूढे प्रत्येक मतदार भारत मातेची शपथ घेऊन प्रतिज्ञा करेल की, कोणत्याही पक्ष आणि पार्टीचा गुंडा, भ्रष्टाचारी, लुटारु उमेदवार जो घटनाबाह्य आहे अशा उमेदवाराला मी माझे मत देणार नाही. मी घटनेप्रमाणे जो पक्ष-पार्टी विरहीत चारित्र्यशिल उमेदवार आहे अशा उमेदवारालाच माझे मत देईन. फक्त पक्ष आणि पार्ट्यांची सत्ता बदलून देशात परिवर्तन येणार नाही हे स्वातंत्र्याच्या ६८ वर्षात जनता अनुभव करत आहे. देशात संपूर्ण व्यवस्था परिवर्तन झाल्याशिवाय परिवर्तन होणार नाही. घटनाबाह्य पक्ष-पार्ट्या संपूर्ण परिवर्तन करू शकत नाही. जनतेचे चारित्र्यशील उमेदवार निवडून गेले तर व्यवस्था परिवर्तन करु शकतील असा विश्वास वाटतो. अनेक लोक म्हणतात की, संसदेत पक्ष आणि पार्टीचे उमेदवार गेले नाहीत तर देश कसा चालणार? आपले संविधान इतके सुंदर आहे की, पंतप्रधानांची निवड कशी करावी याचे मार्गदर्शन संविधानाने केले आहे. सभापतींची निवड कशी करावी? विविध समित्या कशा निवडाव्यात याची मार्गदर्शक तत्वे, संसद चालविण्याचे सर्व मार्गदर्शन घटनेने करून ठेवलेले आहे. त्या घटनेच्या आधारावर जनतेचे उमेदवार सध्याच्या पक्ष-पार्टीच्या उमेदवारापेक्षा चांगली संसद चालवू शकतील.

स्वातंत्र्याच्या ६८ वर्षात अद्याप खरे स्वातंत्र्य न मिळाल्याने आता या देशातील जनतेला स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागणार आहे. या लढाईत जनतेने पक्ष आणि पार्टीचे चिन्ह जे घटनाबाह्य आहे ते हटविणे आणि मतदान यंत्रावरील चारित्र्यशील उमेदवारांच्या फोटोच्या समोरील बटन दाबून आपला मतदानाचा हक्क बजावयाचा आहे. प्रत्येक मतदाराने फक्त एवढे काम केले तरी स्वातंत्र्याची दुसरी लढाई सफल होणार आहे. तर यासाठी देशात समविचारी लोकांचे संघटन तयारकरून संपूर्ण देशामध्ये लोकशिक्षण, लोकजागृतीसाठी जन आंदोलन उभे करावे लागेल.

लढावी लागली. कारण इंग्रज परकीय होते. त्यांना या देशातून काढणे कठीण होते. यामुळे लोकांना शस्त्राद्वारे हिंसा करावी लागली होती. परंतू आता या लढाईला एवढा वेळ लागणार नाही. कोणतेही शस्त्र-अस्त्र हाती घेण्याची गरज नाही. तरी पण ८,१०,१२ वर्षे वेळ लागू शकतो. यासाठी जनता किती वेळेत, किती प्रमाणात संघटित होते यावर ते अवलंबून आहे. स्वातंत्र्याच्या पहिल्या लढाईत लाखो लोकांनी बलिदान केले होते. आता आपल्याला बलिदान करण्याची गरज पडणार नाही. कारण ही लढाई आपल्याला अहिंसेच्या मार्गाने लढावी लागणार आहे. या लढाईत अहिंसेच्या मार्गाने, कुणाशीही भांडण-तंटे न करता मतदार फक्त आपल्या अमूल्य मतदानाच्या अधिकाराचा वापर करून इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन द्वारा बदल घडवून आणू शकतात. त्यासाठी प्रत्येक मतदारांनी भारत मातेची शपथ घेऊन प्रतिज्ञा करायला हवी की मी फक्त चारित्र्यशील उमेदवारालाच माझे मत देईन. पक्ष-पार्टी विरहित उमेदवार जो चारित्र्यशील आहे अशा उमेदवारालाच मी माझे मत देईल. येणाऱ्या १०/१२ वर्षात देशातील गावा-गावात जनजागृती झाली तर एक दिवस असा येईल की, लोकांची, लोकांनी, लोक सहभागातून चालविलेली लोकशाही या देशात येईल. देशातील प्रत्येक राज्यामध्ये गाव स्तरावर लोकशिक्षण व लोकजागृतीचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे संघटन करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. असा प्रयत्न करणारे कार्यकर्ते पुढे येऊन संगठित होऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे.

निवडणूक आयोगाने एक चांगला निर्णय घेतला आहे की, १ मे २०१५ नंतर होणाऱ्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनच्या मतदान यंत्रावर प्रदर्शित केल्या जाणाऱ्या मतपत्रिकेवर विद्यमान आदेशानुसार उमेदवारांचे फोटो मुद्रित होतील असा निर्णय घेतला आहे. उमेदवारांचे फोटो व उमेदवारांचे नाव पॅनलवर मुद्रित होणार आहेत. निवडणूक आयोगाने १ मे २०१५ रोजी हा निर्णय घेतला आहे.

आता देशातील जनतेला एकत्र येऊन निवडणूक आयोगाला विनंती करायची आहे की, आपण इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर उमेदवारांचे फोटो लावणे निश्चित केले आहे, हा लोकतांत्रिक आणि संवैधानिक निर्णय आहे. पण फोटोबरोबर आता कोणत्याही आकृतीची (चिन्हाची) आता आवश्यकता नाही. कारण घटनेत पक्ष-पार्टी, चिन्ह यांचा कुठेही उल्लेख नाही. असे चिन्ह ठेवणे घटनाबाह्य होईल. आपण सर्व जनतेने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर असलेले चिन्ह हटविण्याचा आग्रह करावा लागेल. कारण असे चिन्ह घटनाबाह्य आहे. जर निवडणूक चिन्ह हटविले तर देशात लोकतंत्र येणे अधिक सोपे होईल. त्याच बरोबर पक्ष आणि पार्टीतंत्र आपो-आप कमजोर होऊ शकेल. चला, निवडणूक चिन्ह हटविण्यासाठी स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढण्यासाठी संघटित होऊ या. यापुढे आपले मत पक्ष-पार्टीच्या चिन्हा समोर न देता चारित्र्यशिल उमेदवाराच्या फोटो समोर मत द्या.

या लढाई मध्ये सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपले नाव, ईमेल, मोबाईल, पत्ता खालील पत्त्यावर कळवा.

भारत माता की जय।
वंदे मातरम।

कि० बा० हजारे (अण्णा)
**(कि. बा. तथा अण्णा हजारे)**

**टीप :** हे पत्रक कोणतीही व्यक्ती लोकशिक्षण व जनजागृतीकरिता छापून जनतेमध्ये वाटू शकता.

**राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर, पिन ४१४३०२ (महाराष्ट्र)**
**फोन : ०२४८८-२४०४०१ मो. नं. ०९८५०२००१९०**
Email: annahazareoffice1@gmail.com
www.annahazare.org | www.joinannahazare.org.in